जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2017
पुढारी

# जीवनात यशस्वी होण्यासाठी कौशल्य आत्मसात करणे गरजेचे : डॉ. मोरे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** आधुनिक जगात उमेदवारांनी जास्तीत जास्त ज्ञान आणि कौशल्य मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण, ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग आणि महाराष्ट्र शासनाच्या विद्यापीठ कौशल्यविकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राच्या वतीने शुक्रवारी कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. मोरे यांनी केले. यावेळी ते बोलत होते.डॉ. मोरे म्हणाले, कौशल्य आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. यावेळी सोळा नामांकित कंपन्यांच्या वतीने ७६४ पदांकरिता भरती प्रक्रिया घेण्यात आली. यामध्ये १,०३४ उमेदवारांनी सहभाग घेतला व एकूण २४१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. स्वागत डॉ. एस. बी. सादळे यांनी, प्रास्ताविक रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव यांनी, तर आभार प्रा. अमर डूम यांनी मानले.

7 FEB 2017

लोकमत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### युवा महोत्सव : देशभरातील ८२ विद्यापीठांतील १३०० कलाकारांचा सहभाग

# विद्यापीठात रंगणार 'शिवोत्सव'

कोल्हापूर : तरुणाईचा उत्साह, कला-गुणांचे दर्शन घडविणाऱ्या देशभरातील ८२ विद्यापीठांतील सुमारे १३०० कलाकारांचा सहभाग असणारा 'शिवोत्सव' हा युवा महोत्सव शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून (दि. १०) पाच दिवस रंगणार आहे. चार दिवसांवर येऊन ठेपलेल्या या महोत्सवाची विद्यापीठात वेगाने तयारी सुरु आहे.

विद्यापीठात केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालय, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज् (एआययू) संयुक्त विद्यमाने ३२ वा राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव हा 'शिवोत्सव' नावाने होत आहे. त्यात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्य विभागीय महोत्सवातील पहिल्या तीन क्रमांकांचे विजेते ठरलेले विविध विद्यापीठांमधील सुमारे १३०० विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत. लोकसंगीत, लोकनृत्य, पाश्चिमात्य नृत्य, संगीत, एकांकिका, शास्त्रीय गायन, वादन, समूहगीत, वाद-विवाद अशा २६ प्रकारांमध्ये महोत्सव रंगणार आहे. यासाठी विद्यापीठातील लोककला केंद्र, संगीत व नाट्यशास्त्र, वि. स. खांडेकर भाषा भवन, नीलांबरी सभागृह, मानव्यशास्त्र इमारत येथे स्पर्धा होतील. विविध राज्यांतील विद्यापीठांच्या सहभागामुळे भारतीय कला परंपरा, संस्कृतीचे दर्शन या महोत्सवातून घडणार आहे. यातील पहिल्या क्रमांकाचे विजेते दक्षिण अशियाई आंतरविद्यापीठ महोत्सवात सहभागी होतील. दरम्यान, 'शिवोत्सव'च्या तयारीसाठी विविध २६ समितींद्वारे नियोजन सुरु असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

ते म्हणाले, महोत्सवासाठी आजअखेर महाराष्ट्र, काश्मीर, अमृतसर, पंजाब, कुरुक्षेत्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आदी परिसरातील ६१ विद्यापीठांनी नोंदणी असून, उर्वरीत विद्यापीठांची येत्या तीन दिवसांत होईल. कलाकारांच्या निवासाची व्यवस्था वसतिगृहात केली आहे. व्यासपीठ उभारणी, निमंत्रण पत्रिकांचे वितरण, आदी तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

#### सांस्कृतिक परंपरेचे दर्शन

या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी ६ वाजता श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते, तर चित्रपट अभिनेते सचिन खेडेकर, 'एआययू'चे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड, प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. यावेळी विद्यापीठातर्फे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा कार्यक्रम सादर होईल. यापूर्वी दुपारी ३ वाजता महोत्सवातील सहभागी संघांची शोभायात्रा काढण्यात येईल. त्यासाठी 'कॅशलेस व्यवहार' असा विषय आहे. मंगळवारी (दि. १४) सकाळी १०. ३० वाजता जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महोत्सवाचा समारोप होणार आहे.

## ५३ वा दीक्षांत समारंभ २४ फेब्रुवारीला


अनिल काकोडकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षांत समारंभ दि. २४ फेब्रुवारीला दुपारी ३ वा. होणार आहे. यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ व राष्ट्रीय ऊर्जा आयोगाचे माजी संचालक डॉ. अनिल काकोडकर हे प्रमुख उपस्थितीत असणार आहेत. यावर्षी विद्यापीठाकडून सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. विद्यापीठाने केंद्रीय मंत्रालयाने नेमून दिलेल्या मुंबईतील सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड (सीडीएसएल)या डिपॉझिटरी कंपनीसमवेत जानेवारीमध्ये सामंजस्य करार केला. या करारांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना डिजीटल पदवी प्रमाणपत्रे यावर्षीच्या दीक्षांत समारंभामध्ये देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी सांगितले. दरम्यान, हा समारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने प्रयत्न केले होते.

7 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवोत्सवात सादर होणार देश-विदेशी कला

## विविध कार्यक्रमांची रेलचेल, १२५ विद्यापीठांतील दीड हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारा 'शिवोत्सव-२०१७' हा राष्ट्रीय युवा महोत्सव १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान शिवाजी विद्यापीठात पार पडणार आहे. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आणि केंद्र सरकारच्या क्रीडा आणि युवा मंत्रालयाच्या सहकार्याने आठ वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठामध्ये हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवामध्ये पारंपारेक संगीतापासून पाश्चिमात्य गाण्यापर्यंत तर विविध विषयांवरील चर्चांपासून आकर्षक रंगातील रांगोळ्यांची मेजवानी करवीरकरांना मिळणार आहे.



राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सव १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान शिवाजी विद्यापीठात होत आहे. त्याचे विद्यापीठाच्या वतीने 'शिवोत्सव' असे नामकरण करण्यात आले आहे. या महोत्सवात देशभरातील १२५ विद्यापीठांमधील दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकार सहभागी होणार आहेत. देशभरातील संस्कृतीचे दर्शन या महोत्सवातून घडणार आहे. महोत्सवाची विविध पातळ्यांवर विद्यापीठात जय्यत तयारी सुरू आहे.

विविध कलाप्रकारांद्वारे भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कलागुणांना राष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने व या कलांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी एआययू आणि केंद्र सरकारच्या क्रीडा आणि युवा मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव आयोजित केला जातो.

गेल्या वर्षीचा युवा महोत्सव म्हैसूरमध्ये झाला होता. यंदाचा ३२ वा महोत्सव शिवाजी विद्यापीठात होणार आहे. त्यात संगीत, गायन, फाईन आर्ट, नृत्य, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, लघुनाटिका, मूकनाट्य, एकांकिका अशा विविध २६ कला प्रकारांमध्ये महोत्सवात स्पर्धा होणार आहेत. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी नोंदणी, विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून चित्ररथ, सायंकाळी ६ वाजता उद्घाटन समारंभ, तर ७.३० वाजता विद्यापीठातर्फे सांस्कृतिक समारंभ साजरा केला जाणार आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसापासून एकूण पाच रंगमंचावर कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. शनिवारी सकाळी १० वाजता वेस्टर्न सोलो, एकांकिका, प्रश्नमंजूषा, पारंपरिक संगीत, दुपारी १ वाजता वेस्टर्न ग्रुप साँग, वक्तृत्व, पोस्टर मेकिंग, वैयक्तिक पारंपरिक संगीताचा कार्यक्रम, तर सायंकाळी ४ वाजता लोककला आदी सादर केले जाणार आहेत. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रविवारी मौखिक अभिनय, एकांकिका, चर्चासत्र पार पडणार आहे. दुपारी दोन वाजता ग्रुप साँग, अंतिम प्रश्नमंजूषा, व्यंगचित्रे, क्लाय मॉडेलिंग आदी कार्यक्रम पार पडणार आहे. महोत्सवात सोमवारी सकाळी क्लासिकल ड्रामा, लघुनाटिका, स्पॉट फोटोग्राफी, रांगोळी स्पर्धा होणार आहेत. दुपारी मिमीक्री व स्पॉट पेंटिंग होणार आहे. मंगळवारी सकाळी १०.३० वाजता समारोप समारंभ होणार आहे.

देशातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्यवर्ती विभागातील महोत्सवातील विविध कला प्रकारांमधील पहिल्या तीन क्रमांकाच्या विजेत्या विद्यापीठांचे संघ 'शिवोत्सव'मध्ये सहभागी होणार आहेत. त्यांची नोंदणी अखेरच्या टप्प्यात आहे. महोत्सवातील सर्व कलाकृती या लोककला केंद्र, भाषा भवन सभागृह, बॉटनी विभागातील नीलांबरी सभागृह, मानव्य शास्त्र विभाग आणि संगीतशास्त्र विभागात सर्व कार्यक्रम पार पडणार आहेत. सर्व कार्यक्रमांना कोणतेही शुल्क नसल्याने देशभरातील संस्कृतीचा आविष्काराचा आस्वाद करवीरकरांना चाखता येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-7 FEB 2017
सकाळ

# दीक्षान्त सोहळा २४ फेब्रुवारीला

**काकडे :** डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षान्त सोहळा येत्या २४ फेब्रुवारीला होत आहे. राजीव गांधी विज्ञान आणि प्रौद्योगिकी आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे असून लोककला केंद्रात सोहळा होणार आहे. त्याबाबतची माहिती परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली आहे.

विद्यापीठाचा सोहळा कधी होणार, याची उत्सुकता विद्यार्थ्यांत होती. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे परदेशात गेल्याने तो कोणत्या तारखेला होणार, अशी विचारणा होत होती. विद्यापीठ प्रशासनातर्फे प्रमुख पाहुण्यांसाठी शोधही सुरू होता. त्यांची तारीख निश्चित होत नव्हती. डॉ. काकोडकर यांनी २४ फेब्रुवारीला ग्रीन सिग्नल दिल्याने सोहळ्याची तारीख आज जाहीर करण्यात आली आहे.

डॉ. काकोडकर यांनी मुंबईच्या रूपारेल कॉलेजमधून



बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर ते यंत्रशास्त्रीय तंत्रज्ञानाची पदवी मिळविली. भाभा अणुसंशोधन केंद्रात ते १९६४ ला रुजू झाले. त्यांनी नॉटिंगहॅम विद्यापीठातील १९६९ला पदव्युत्तर पदवी मिळविली. भाभा संशोधन केंद्रात प्रक्रिया अभियांत्रिकी (रिॲक्टर इंजिनिअरिंग) विभागात बनणाऱ्या ध्रुव रिॲक्टरमध्ये नवे व उच्च तंत्रज्ञान वापरून मोलाची भर टाकली. ते १९७४ व १९९८च्या अणुचाचणीच्या मुख्य चमूचे सभासद होते. त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

7 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# २४ फेब्रुवारीला दीक्षान्त समारंभ



डॉ. काकोडकर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षान्त समारंभ विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये २४ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता होणार आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर उपस्थित राहणार आहेत.



विद्यापीठाच्या यंदाच्या दीक्षान्त समारंभात ५१ हजार स्नातकांना पदवी आणि पदव्युत्तर प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यापैकी २३ हजार स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रमाणपत्र स्वीकारतील. तर यंदाच्या दीक्षान्त समारंभाला उपस्थित राहू इच्छिणारे डॉ. काकोडकर यांनी राष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाचे संचालक व राजीव गांधी विज्ञान आणि महाराष्ट्र राज्य प्रौद्योगिक आयोगाच्या अध्यक्षपदची धुरा सांभाळली आहे. दीक्षान्त समारंभावेळी डॉ. काकोडकर उपस्थित स्नातकांना मार्गदर्शन करणार आहेत. दीक्षान्त समारंभासाठी राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांना निमंत्रीत करण्यात येणार असल्याचे विद्यापीठातील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 FEB 2017
पुढारी

# दीक्षांत समारंभ २४ फेब्रुवारीस

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या प्रांगणात २४ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास राज्य सरकारच्या राजीव गांधी विज्ञान आणि प्रौद्योगिक आयोगाचे अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. दीक्षांत समारंभास सुमारे पन्नास हजार स्नातकाना पदवी दिली जाणार आहे.

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे
- सुमारे पन्नास हजार स्नातकांना पदवी देणार


शिवाजी विद्यापीठातून...

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 FEB 2017
तरुण भारत

# पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर दीक्षान्त समारंभाचे प्रमुख अतिथी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५२ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार २४ रोजी होणार आहे. या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मविभूषण, राजीव गांधी विज्ञान आणि प्रौद्योगिकी आयोग महाराष्ट्र शासनचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय अणुउर्जा आयोगाचे माजी संचालक डॉ. अनिल काकोडकर उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता स्नातकांना ते मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी जवळपास ४५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. शिवाय २६ हजार विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्र पाठवली जाणार आहे. तसेच पीएच.डी. पदवी पैकी फॅकल्टी ऑफ आर्ट अॅन्ड फायनल आर्ट, सोशल सायन्स, विज्ञान विभाग, कॉमर्स विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, अभियांत्रिकी आदी विभागांतील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर दिली जाणार आहेत, त्यासाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा, असे आवाहनही काकडे यांनी यावेळी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
7 FEB 2017
पुढारी

# २४ मार्चपासून उन्हाळी सत्र परीक्षा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा २४ मार्च २०१७ पासून सुरू होणार आहेत. विविध ६२१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. या परीक्षांबाबत सर्व कॉलेज व्यवस्थापनांना लेखी कळवण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज वेळेत सादर करणे आवश्यक असून कोणत्याही स्थितीत मुदतीनंतर परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच भरावेत आणि कॉलेज प्रशासनांनी ऑनलाईनच परीक्षा अर्ज स्वीकारावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

दरम्यान, १६ एप्रिल २०१७ रोजी सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) असणार आहे. त्यामुळे परीक्षेच्या आधीच्या दिवशी म्हणजे १५ एप्रिल व परीक्षेदिवशी अशा दोन्ही दिवशी तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाची एमएचटी-सीईटी सामाईक प्रवेश परीक्षा ११ मे रोजी आहे. या परीक्षेच्या आधीच्या दिवशी तसेच परीक्षेदिवशीही असे मिळून एकूण चार दिवस विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षा आयोजित होणार नसल्याचे कळवण्यात आले आहे.

- २४ मार्च ते ३१ मे अखेर परीक्षा
- एकूण ६२१ सत्र परीक्षा होणार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 FEB 2017
लोकमत

# विद्यापीठ परीक्षा २४ मार्चपासून

कोल्हापूर : मार्च-एप्रिल या उन्हाळी सत्रात विद्यापीठातर्फे बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बीएबीएड्, बीबीए, एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी अशा विविध अभ्यासक्रमांच्या ६२१ परीक्षा शिवाजी विद्यापीठ दुसऱ्या सत्रात घेणार आहे. त्याची सुरुवात दि. २४ मार्चपासून होणार आहे. या सत्रात बी. कॉम. अभ्यासक्रमाच्या पहिल्या आणि शेवटच्या सत्रासाठी 'एसआरपीडी' प्रणालीचा वापर केला जाणार आहे.

या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावयाचे आहेत. त्याची सुरुवात आज, मंगळवारपासून होणार आहे. 'सिक्युर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी' (एसआरपीडी) म्हणजे गोपनीय व नियंत्रित पद्धतीने प्रश्नपत्रिका वितरणाची या सत्रामध्ये व्याप्ती वाढविण्यात येणार आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१६ मध्ये होणाऱ्या वीस अभ्यासक्रमांच्या तीन हजार प्रश्नपत्रिका 'एसआरपीडी'द्वारे वितरित करण्यात आल्या आहेत.

बी. कॉम. अभ्यासक्रमासाठी एसआरपीडी प्रणालीचा वापर केला जाणार आहे. या परीक्षांच्या तारखा, शुल्क आदींबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असल्याचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी सांगितले. (प्रतिनिधी)

### परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा

- विनाविलंब शुल्क : दि. २८ फेब्रुवारीपर्यंत
- विलंब शुल्कासहित : दि. १ मार्च ते ६ मार्चपर्यंत
- अतिविलंब शुल्कासहित : दि. ७ ते ११ मार्चपर्यंत

7 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धा परीक्षांना युद्धासारखे उत्तम तयारीनेच जा

## मदन नागरगोजे : शिवाजी विद्यापीठात 'स्पर्धा परीक्षा कौशल्ये'वर व्याख्यान

कोल्हापूर : स्पर्धा परीक्षा युद्धापेक्षा कमी नसतात, त्या युद्धासारख्याच असतात. त्यांना आपल्या उत्तम तयारीच्या गनिमी काव्याने उत्तर दिले पाहिजे, असे प्रतिपादन मूळचे कोल्हापूरचे व सध्या झांशी येथे कार्यरत असलेले जिल्हाधिकारी मदन नागरगोजे यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'स्पर्धा परीक्षा कौशल्ये' असा होता. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले होते.

### जिल्हाधिकारी नागरगोजे म्हणाले...

- वैश्विकतेमुळे आजच्या पिढीला जगामध्ये आपले स्थान निर्माण करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.
- सखोलज्ञानासह विविध कौशल्यही प्राप्त करणे आवश्यक आहे.
- संवाद कौशल्यासह इंग्रजीचे ज्ञानही आवश्यक आहे.
- स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्यासाठी उपलब्ध वेळेचे योग नियोजन व अंमलबजावणी महत्त्वाची आहे.
- आपल्यातील उणिवांचा शोध घेऊन त्या दूर करणे गरजेचे



शिवाजी विद्यापीठात सोमवारी जिल्हाधिकारी मदन नागरगोजे यांनी मार्गदर्शन केले.

मदन नागरगोजे म्हणाले, विद्यार्थ्यांचे मन मोबाईलसारखे असते. त्यामध्ये अभ्यासाच्या गोष्टी इन्स्टॉल केल्यास ध्येयप्राप्ती होणे शक्य आहे. स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना प्रथम आपण जीवनामध्ये काय होऊ इच्छितो आणि काय होऊ इच्छित नाही याचा निश्चित वेध घेणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा हे एक यज्ञ आहे, त्यामध्ये स्वत:ला समर्पित करण्याची तयारी असली पाहिजे. विद्या ही जीवनपद्धती असून उपलब्ध व्यासपीठाचा योग्य उपयोग केला पाहिजे. खेळ फक्त स्पर्धेसाठी नसून त्याचा उपयोग अभ्यासासाठी करून घेतला पाहिजे. प्रभारी वित्त व लेखाधिकारी चौगुले म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वत:शी स्पर्धा करावी, स्पर्धा करताना खिळाडू वृत्ती जोपासावी. आपल्याकडील उपलब्ध साधनांचा वापर करुन स्पर्धा परीक्षांमध्ये यश प्राप्त करणे शक्य आहे.

कार्यक्रमात कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. मारूलकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 FEB 2017
पुढारी

# स्पर्धा परीक्षा युद्धापेक्षा कमी नसतात : नागरगोजे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षा युद्धापेक्षा कमी नसतात. त्यांची युद्धाच्या तयारीसारखीच जय्यत तयारी करावी लागते. यासाठी विद्यार्थ्यांनी गनिमी काव्याने म्हणजेच उत्तम तयारीने या परीक्षांना उत्तर दिले पाहिजे, असे प्रतिपादन झांशी (उत्तर प्रदेश) येथील जिल्हाधिकारी मदन नागरगोजे यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शाहू सभागृहामध्ये आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले होते.



नागरगोजे म्हणाले, खेळ फक्त स्पर्धेसाठी नसून, त्यांचा उपयोग अभ्यासासाठीही करून घेतला पाहिजे. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना जीवनामध्ये मार्गदर्शक ठरणारे, सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे संस्कारिक चित्रपटही पाहिले पाहिजेत. जीवनाचा लढा एकट्याच्या ताकदीवर पूर्ण करता येत नाही; त्यासाठी चांगल्या शिक्षकांच्या सहकार्याची, मार्गदर्शनाची गरज भासते. प्रास्ताविक कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मनले.

7 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# हस्तलिखित विषयातही होते करिअर!

## प्रियंका मुजूमदारचा आदर्श; मॅन्युस्क्रिप्ट सर्व्हेअर म्हणून कार्यरत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : करिअर केवळ अभियांत्रिकी, वैद्यकीय अथवा आयटीमध्ये करता येते असे नाही. अगदी हस्तलिखितासारख्या विषयातही ते करता येते. याचा आदर्श प्रियंका मुजूमदार या युवतीने घालून दिला आहे. शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक मंत्रालयाच्या इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर आर्टस्च्या नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्टसाठी सर्व्हेअर म्हणून ती कार्यरत आहे.

हस्तलिखितांत ब्राह्मी, बंगाली, मोडी, शारदा यांसारख्या अनेक भारतीय लिपी शिकविल्या जातात.



पुरातन काळापासून जपलेली हस्तलिखिते दुर्लक्षामुळे फाटलेल्या व जीर्ण अवस्थेत आहेत. फाटलेल्या हस्तलिखितांचे संदर्भ जोडून, ते दुरुस्त करून त्याचे स्कॅनिंग, डिजिटलायझेशन कसे करायचे, हे हस्तलिखिताच्या अभ्यासक्रमात शिकविले जाते. हे

### दृष्टीक्षेपात...

- विद्यापीठाच्या ग्रंथालयात दहा हजार हस्तलिखिते
- नऊ हजार हस्तलिखितांचे डॉक्युमेंटेशन
- देशात ५७ हस्तलिखित केंद्रे
- महाराष्ट्रात पाच केंद्रे

काम करणाऱ्यांना सर्व्हेअर म्हणून ओळखले जाते. प्रियांकाने आजपर्यंत दहा हजारांहून अधिक हस्तलिखितांचे डॉक्युमेंटेशन केले आहे. पाचशे वर्षांपूर्वीच्या हस्तलिखितांचा अभ्यास करून त्याचेही संवर्धन केले आहे. या अभ्यासात त्यांना संत ज्ञानेश्वरांच्या मोक्षपटाची दोन हस्तलिखितेही मिळाली. दुसरे ज्ञानेश्वरांना कोणत्या स्थानावर मोक्षप्राप्ती झाली, हे सांगणारे आहे.

हे हस्तलिखित अत्यंत दुर्मीळ असून, ते केवळ शिवाजी विद्यापीठात उपलब्ध आहे. मोक्षपटाचे हस्तलिखित बडोदामधील सयाजीराव गायकवाड विद्यापीठाच्या हस्तलिखित ग्रंथालय व शिवाजी विद्यापीठात पाहायला मिळते.



"सध्या माझा विविध मोक्षपटाच्या हस्तलिखितांचा अभ्यास सुरू आहे. त्यासाठी बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांचे सहकार्य मिळत आहे.

\- प्रियंका मुजूमदार

मोक्षपटाबाबत प्रियंका म्हणाली, "सध्या आपण खेळत असलेल्या सापशिडीचे आद्य रूप हा मोक्षपट आहे. संत ज्ञानेश्वर ते सोपानदेव अशी एकूण १३० घरे आहेत. त्यावर श्रीमत्परब्रह्मनिर्गुण सायोज्यमुक्ती जननमरणरहितमहाकैवल्यप्रणित असे वाक्य लिहिले आहे. खेळाच्या वर्णनावरून उजव्या बाजूला सर्व वरची घरे प्राप्त होऊन मोक्ष कसा मिळेल, तर डाव्या बाजूस पतन कसे होते व माणूस रसातळाला कसा जातो, हे सांगितले आहे. ज्ञानेश्वरांना ८६ व्या घरात मोक्षप्राप्ती झाल्याचे खेळातून दिसून येते."

-7 FEB 2017


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

## वंदना सोनाळकर : शिवाजी विद्यापीठामध्ये चर्चासत्र

# स्त्रियांच्या सहभागानेच देशाचा विकास

कोल्हापूर : स्त्रियांच्या सहभागाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे, असे मत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या ॲडव्हान्स सेंटर फॉर वुमेन्स स्टडीजच्या प्रा. डॉ. वंदना सोनाळकर यांनी येथे व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्रात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे होते. चर्चासत्राचा विषय 'भारतातील लैंगिकतेचा प्रश्न, समस्या आणि भवितव्य' असा होता.

यावेळी प्रा. सोनाळकर म्हणाल्या, स्त्रियांवर होणारे अत्याचार ही भारतामध्ये नवीन बाब नाही. शारीरिक, मानसिक पातळीवरती होणाऱ्या अत्याचारात वाढच होत आहे. आपला देश हा कृषिप्रधान असल्यामुळे स्त्रियांवरील जबाबदारीही सर्वाधिक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या अनेक आंदोलनांमुळे काही अंशी स्त्रियांच्या परिस्थितीत बदल झाला आहे.

डॉ. मोरे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री शिक्षणावर अनेक निर्बंधामुळे शिक्षणातील टक्का हा अत्यंत कमी होता; परंतु अनेकांच्या प्रयत्नांमुळे आजची सकारात्मक स्थिती निर्माण झाली आहे. भारत महासत्ता व्हायचा असेल, तर स्त्रियांना सर्वच क्षेत्रांत संधी मिळायला हवी. लिंग आधारित भेदभाव नष्ट झाल्याशिवाय प्रगती साधता येणार नाही.

कार्यक्रमास डॉ. आर. बी. पाटील, विजय मारुलकर, प्रा.बी. के. नागला, एस. सी. राजोरा, भारती पाटील, श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. चर्चासत्राच्या समन्वयिका प्रतिमा पवार यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

### वंदना सोनाळकर म्हणाल्या...

- समाजसुधारक महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री प्रश्नांसंबंधी केलेल्या कार्यामुळे आज सर्वच क्षेत्रांत स्त्रिया आघाडीवर असल्याचे दिसून येते.
- राजकीय क्षेत्रात जरी महिलांना आरक्षण असले तरी म्हणावा तसा सहभाग जाणवत नाही.

7 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# मुलींच्या सुरक्षिततेसाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे

## लेखिका डॉ. सुधा कांकरिया यांचे प्रतिपादन : विद्यापीठात ‘सामाजिक हिंसा आणि शोषण’ विषयावर कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

गेल्या तीस वर्षात दीड कोटी स्त्रीभ्रूण हत्या झाल्या आहेत. भविष्यात अशा घटनांमुळे स्त्री–पुरूष समतोल बिघडणार आहे. समाजाचे आरोग्य जपण्यासाठी स्त्रीभ्रूण हत्या रोखणे काळाची गरज आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे आहे. त्याला कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची साथ लाभली पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका डॉ. सुधा कांकरिया यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘सामाजिक हिंसा आणि शोषण’ यावरील पत्रकारांसाठीच्या आयोजित कार्यशाळेत ‘स्त्री जन्माचे स्वागत करूया’ या विषयावर त्या बोलत होत्या. वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी हॉलमध्ये झालेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मंगला पाटील–बडदारे होत्या.



कोल्हापूर : विद्यापीठातील ‘सामाजिक हिंसा आणि शोषण’ कार्यशाळेत शपथ देताना डॉ. सुधा कांकरिया. सोबत डावीकडून डॉ. सुमेधा साळुंखे, साधना झाडबुके, डॉ. मंगला पाटील–बडदारे, डॉ. निशा पवार आदी.

डॉ. कांकरिया म्हणाल्या, मुलगी जन्माला येण्यापूर्वीच तिची हत्या केली जाते. त्यामुळे मुलींचा जन्मदर घसरत आहे, ही चिंताजनक बाब आहे. शेकडो वर्षापासून महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. मात्र याच महिलांनी गुणवत्ता सिध्द करून, राष्ट्रपतीपदासह प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. घरातील आईच कुटुंबावर वात्सल्य, संस्कार करीत असते. म्हणून वात्सल्याच्या विद्यापीठाची कुलगुरू आईच आहे. तिला कधीही तराजूमध्ये तोलता येणार नाही. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्यांची कडक अंमलबजावणी करून कृती आराखडा तयार करूण स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासंदर्भात जनजागृतीसाठी मुलींच्या जन्माचे स्वागत कृती कार्यक्रमाने करण्याची गरज असल्याचे डॉ. कांकरिया यांनी सांगितले.

उद्घाटनप्रसंगी पर्यावरणतज्ज्ञ डॉ. जय सामंत यांनी शाश्वत विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, पर्यावरण याविषयी मार्गदर्शन केले. तर समारोप सामाजिक कार्यकर्त्या साधना झाडबुके यांनी ‘संवेदना’ संस्थेचे अनुभव सांगितले. श्वेता पत्की यांनी बालमृत्यू, बालमाता या विषयावर मार्गदर्शन केले.

वृत्तपत्र विद्या आणि मास कम्युनिकेशन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी उपस्थितांना दिली शपथ

डॉ. सुधा कांकरिया यांनी स्त्रीचा आदर राखणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखून मुलींचा जन्मदर वाढवणे याविषयी उपस्थितांना शपथ दिली. तसेच उपस्थित मुलींना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 FEB 2017
पुढारी

# डॉ. प्रल्हाद माने यांची निवड

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे चौदाव्या राष्ट्रीय युवक संसद स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचे समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. संसदीय कार्य मंत्रालयातर्फे विद्यापीठे आणि महाविद्यालयांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये संसदीय लोकशाही आणि संसदेच्या कामकाजाविषयी जागृती निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय युवक संसद स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेसाठी देशभरातील विद्यापीठनिहाय समन्वयकांचे उद्बोधन शिबिर नुकतेच पद्दुचेरी येथे पार पडले. यामध्ये डॉ. माने सहभागी झाले होते. डॉ. माने यांची या स्पर्धेचे ग्रुप समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. छत्तीसगड राज्यातील दोन आणि कर्नाटक राज्यातील दोन विद्यापीठांच्या राष्ट्रीय युवक संसदेचे मूल्यमापन प्रक्रियेचे काम डॉ. माने यांच्याकडे सोपविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

7 FEB 2017

तरुण भारत

# 'ई लर्निंग ॲण्ड इनोव्हेटिव्ह पेडॅगॉगीज' विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय (श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय क्लस्टर) योजनेअंतर्गत विवेकानंद कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे 'ई लर्निंग ॲण्ड इनोव्हेटीव्ह पेडॅगॉगीज" या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली.

सकाळच्या सत्रात प्रमुख पाहुणे पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूटचे डॉ.आर.एम.पाटील यांनी आपल्या व्याख्यानामध्ये अभिनय अध्यापन शास्त्रासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रातील प्रमुख पाहुणे सायबरचे डॉ.अजय शिंदे यांनी संगणक व इंटरनेटच्या विश्वात शिक्षण कोठूनही कसे उपलब्ध करता येते याबाबतची माहिती सांगितली. शिक्षकांनी पारंपरिक पध्दतीचा अवलंब न करता डायनॅमिक पध्दतीचा वापर करावा, याबाबत मुडलचे उदाहरण देवून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.हिंदुराव पाटील होते. डॉ.पाटील यांनी, महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच नवीन गोष्टी, कल्पना विद्यार्थ्यांनी कशा आत्मसात केल्या पाहिजेत याविषयीची माहिती दिली. स्वागत व प्रास्ताविक प्रा.राजश्री पाटील यांनी केले. कार्यशाळेसाठी समन्वयक प्रा.एस.व्ही.मालगांवकर, डॉ.विशाल वाघमारे, प्रा.इरफान मुजावर व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींसह शहरातील अग्रणी महाविद्यालय अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील ८० विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. आभार प्रा. ज्योती चव्हाण यांनी मानले.

**विवेकानंद च्या कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे आयोजन**